दैनिक


www.sahyandrinews.com

# सह्याद्रीचा राखणदार

Scan QR code to visit... Epaper Portal

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक ४० • Title - Code :- MAHMAR49513 • शनिवार दि.२८ ऑक्टोबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.



# फडणवीस महाराष्ट्राचे पुन्हा मुख्यमंत्री होणार?

## भाजपच्या ट्विटमुळे राजकीय भूकंपाचे संकेत, पण नंतर केले डिलीट

**मुंबई-महाराष्ट्र भाजपकडून एक ट्विट करण्यात आले आहे. त्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना सुरुवात झाली आहे. भाजपकडून ट्विट करण्यात आलेल्या व्हिडिओमध्ये माजी मुख्यमंत्री आणि सध्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस 'मी पुन्हा येईन' म्हणत असताना दिसत आहेत. त्यामुळे राज्यात पुन्हा एकदा राजकीय भूकंप पाहायला मिळेल काय? अशी शंका व्यक्त केली जात असतानाच हे ट्विट डिलीट करण्यात आले आहे.**

दसरा मेळाव्याच्या दुसऱ्या दिवशी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दिल्लीच्या दौऱ्यावर गेले होते. त्यानंतर काल पंतप्रधान नरेंद्र मोदी महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आले होते. दुसरीकडे सर्वोच्च न्यायालयाच्या आक्रमक भूमिकेमुळं विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी शिवसेनेच्या आमदारांच्या अपात्रतेच्या कारवाईने वेग घेतला आहे. हेच टायमिंग साधत महाराष्ट्र भाजपने देवेंद्र फडणवीसांचा मी पुन्हा येईन हा व्हिडिओ ट्विट केला आहे. त्यामुळे महाराष्ट्रात पुन्हा राजकीय भूकंप होणार का? अशा चर्चा सुरु झालेल्या आहेत.पक्षाचा एक कार्यकर्ता, पदाधिकारी आणि आमदार म्हणून देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले तर मला निश्चितच आवडेल. आम्ही त्याचे स्वागत करु, अशी प्रतिक्रिया प्रसाद लाड यांनी दिली आहे. भाजपच्या अधिकृत ट्विटर अकाउंटवर हा व्हिडिओ ट्विट करण्यात आला आहे. त्यामुळे आम्हाला स्वागतच करावे लागेल आणि आनंद सुद्धा होईल, असे प्रसाद लाड म्हणाले.दरम्यान भाजपने ट्विट केलेल्या या व्हिडिओवर ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. फडणवीस मुख्यमंत्री म्हणून पुन्हा कधीही येऊ शकणार नाही. संपूर्ण भाजपला सध्या फडणवीसांच्या हो ला हो करावे लागेल. त्यामुळे ते असे काहीतरी करतात, असे म्हणत सुषमा अंधारेंनी भाजपवर हल्लाबोल केला.हा व्हिडिओ महाराष्ट्र भाजपच्या अधिकृत ट्विटर अकाऊंटवरुन ट्विट करण्यात आला. परंतु याबद्दल काहीच कल्पना नसल्याचे म्हणत प्रवीण दरेकांनी म्हटले. यावर बोलताना त्यांनी म्हटले की, भाजपचा कार्यकर्ता म्हणून देवेंद्र फडणवीसांचे नेतृत्व आम्हाला आनंद देणारे असेल. पण फडणवीसांनी स्पष्ट सांगितले आहे की, एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वाखाली आम्ही एकत्र काम करणार आहोत. त्यामुळे कोणत्याही जर तर च्या प्रश्नांना काहीच अर्थ नाही. तसेच हा जुना व्हिडिओ का पुन्हा ट्विट करण्यात आला याबद्दल देखील लवकरच स्पष्टोवक्ती केली जाईल.

### आरोग्य विभागाचे कामकाज कोलमडले

## तालुका आरोग्य अधिकारी कार्यालया समोर ठिय्या;कंत्राटी कर्मचाऱ्यांचे कामबंद आंदोलन



**अहेरी तालुक्यातील ८७ कर्मचाऱ्यांचा समावेश**

**अहेरी तालुक्यात एकूण ६ प्राथमिक आरोग्य केंद्र,३६ उपकेंद्र असून येथील ३६ कंत्राटी कर्मचारी बेमुदत काम बंद आंदोलनात सहभागी झाले तर अहेरी उप जिल्हा रुग्णालयातील तब्बल ५१ कंत्राटी कर्मचारी यात सहभाग झाल्याने कामावर विपरीत परिणाम होत आहे.यात स्टाफ नर्स, लॅब टेक्नशियन,तालुका लेखापाल,आरोग्य सेविका,समूदाय आरोग्य अधिकारी यांचा समावेश आहे.लवकरात लवकर यावर तोडगा निघाला नाही तर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सामूहिक आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे.**

**आलापल्ली । प्रतिनिधी**

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांनी कायम सेवेत सामावून घ्यावे, या मागणीसाठी २५ ऑक्टोबरपासून बेमुदत काम बंद आंदोलन सुरू केले असून अहेरीच्या तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय समोर कंत्राटी कर्मचाऱ्यांनी ठिय्या मांडला आहे.

विशेष म्हणचे २५ ऑक्टोबर रोजी जिल्हा परिषदेसमोर आंदोलन केले होते. तर दुसऱ्या दिवशी कर्मचाऱ्यांनी तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय समोर ठिय्या देत लक्ष वेधत आहेत.तर २७ ऑक्टोबर रोजी या कामबंद आंदोलनाचा तिसरा दिवस असून यावर कुठलाही निर्णय न झाल्याने आरोग्य विभागाच्या कामकाजावर विपरीत परिणाम होत आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियान कंत्राटी अधिकारी व कर्मचारी समायोजन कृती समिती जिल्हा गडचिरोलीच्या वतीने २५ रोजी इंदिरा गांधी चौकातून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे मोर्चा काढला होता.तर २६ तारखेपासून प्रत्येक तालुका मुख्यालयात बेमुदत कामबंद आंदोलन सुरू करण्यात आला आहे.आम्हाला कोविड योद्धा म्हणून उपाधी नको, प्रमाणपत्र नको, गुलदस्ते नको, आम्हाला समायोजन हवे आहे, अशी मागणी करण्यात आली.यावेळी सरकारच्या धोरणावर टीका केली. आरोग्य मंत्र्यांनी ३१ मार्च २०२३ पर्यंत सेवेत सामावून घेण्याचे आश्वासन यापूर्वी दिले होते, परंतु आश्वासनाची पूर्तता केली नाही, असा आरोप आंदोलक आरोग्य अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केला.

# प्रसूती करिता आलेल्या मातेचा बाळासह मृत्यू

### भाजपा पदाधिकाऱ्यांचे जिल्हाधिकारी यांना सखोल चौकशी करण्याचे निवेदन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

अर्शिला रूपेश मेश्राम, वय-२३ वर्षे, राह. नवेगाव (वाघाडे) ता. गोंडपिपरी जि. चंद्रपूर येथील गरोदर महिलेला स्वास घेण्यास त्रास होत असल्याने दि.२३ऑक्टोंबर रोजी रात्री १२.०० वाजता च्या दरम्यान गोंडपिपरी येथील शासकिय रूग्णालय येथे तिच्या पतीने भर्ती करण्यासाठी नेले होते. रूग्णालयातील कर्तव्यावर असलेल्या डॉक्टरांनी सदर महिलेची प्रकृती बिघडत असल्याचे पाहून तीला एका तासात शासकीय जिल्हा महाविद्यालय, चंद्रपूर येथे रेफर केले. पहाटे २.३० ते ३.०० वाजताच्या दरम्यान ते वैद्यकिय महाविद्यालय, चंद्रपूर येथे पोहोचले. तसेच तीला प्रस्तुती वार्डात भर्ती करून घेण्यात आले. तेव्हा तिच्यावर उपचार सुरू असतांना दि. २४ ऑक्टोंबर ला सायं. ७.३० वाजता च्या दरम्यान सदर महिलेचा मृत्यु झाला.



प्रसूतीच्या काळात रुणालयात संबंधित डॉक्टरांच्या दुर्लक्षीतपणामुळे सदर मातेचा बाळासह मृत्यु झाला असल्याचे परिवारातील सदस्यांचे म्हणणे आहे. तेव्हा सदर घटनेचे गाभीर्य लक्षात घेता भाजपा जिल्हाध्यक्ष राहुल पावडे यांना सदर घटनेची दूरध्वनी वरून माहिती मिळताच तत्काळ पदाधिकाऱ्यांना रुणालयात पाठवून घटनेची माहिती घेण्यास सांगितले आणि पावडे यांनी जिल्हा महामंत्री ब्रिजभूषन पाझारे,अनु. जमाती मोर्चा जिल्हाध्यक्ष धनराज कोवे,बंडू गौरकार,साजिद भाई, प्रवीण उराडे,आकाश मस्के,अमित निरंजन यांच्या सोबत जिल्हाधिकारी यांची भेट घेतली व निवेदन दिले या घटनेची सखोल चैकशी व्हावी व दोषी असलेल्या संबंधीत डॉक्टर व कर्मचारी यांच्यावर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी तसेच वैद्यकीय महाविद्यालयातील अनेक सोई सुविधा आणि रुगांच्या मदती साठी गठित केलेली समिती द्वारे वेळोवेळी केलेल्या सूचनाने अनेक सुविधा होत आहेत मात्र ह्या घटनेची चौकशी करण्याचे जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले. आणि अश्या घटनेची पुनरावृत्ती होऊ नये या साठी ठोस उपाय करण्यात यावे अशी विनंती केली आहे. दिलेल्या निवेदनाला जिल्हाधिकारी यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

# पुरस्कार प्राप्त शिक्षिका पूरेड्डीवारने दिला सामाजिक दायित्वाचा परिचय

**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

समाजात वावरतांना आपनही समाजाचे काहि देणं लागतो,या भावनेतून आक्सापूर शाळेतील जिल्हा पूरस्कार प्राप्त शिक्षिका सुशिला पुरेड्डीवार अनेकांच्या मदतीला धावून जातात.अश्यातच आपल्याच शाळेतील विद्यार्थिनी अपघाताने पडली.तीला गंभिर दूखापत झाली.तीला मदतीची गरज आहे.यातच कुटूंबाची परिस्थिती बेताची.हे समजताच संवेदनाशील असलेल्या शिक्षिकेचे मन हेलावले.लागलीच क्षणाचाही विलंब न करता उपक्रमशिल आणि संवेदनाशील शिक्षिका असलेल्या सुशिला पोरेड्डिवार यांनी श्रिद्धीसह पेंदोर कुटूंबियांची भेट घेतली.विचारपूस केली.आणि समोरिल शिक्षणासाठी श्रिद्धीला दत्तक घेत असल्याचे कुटूंबियांना सांगितले.श्रिद्धीला ७ व्या वर्गापर्यत येणारा सर्व आपण उचलणार असल्याचे सांगितले.इयत्ता ५ वीत शिक्षण घेणाऱ्या श्रिद्धी पेंदोर या विद्यार्थीनिला दोन वर्षासाठी दत्तक घेत शिक्षिकेने कर्तव्यापलीकडची बांधिलकी



निभावली आहे.

शिक्षिका पूरेड्डीवार यांचे सामाजिक,शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य राहिले आहे.जिल्ह्यातील आदीवासी आणि दुर्गम भागातील जिवती येथील वर्षभर चालणारी जि.प.उ.प्राथमिक शाळा पालडोह या शाळेला मुलींसाठी सॅनिटरी वेंडिंग मशीन भेट दिली.यासह पल्लेझरी शाळेत महिला मेळावा घेतला.मुलींना सॅनिटरी पॅड वाटप केले.बामणीत झोपडपट्टीतील लोकांना ब्लँकेटचे वाटप केले.बल्लारशाहतील विकलांगांना मदत केली.धान्य किट देत जगण्याची नवी उमेद जागवली.कोलाम दिंडीतील हजारो लोकांना पाणी स्टॉल लावत तहाण भागविली.राजुरा शहरालगत झोपडपट्टीतील विद्यार्थ्यांना दत्तक घेत शिक्षणाच्या प्रवाहात आणले.आजतागायत प्राथमिक शाळेचा विद्यार्थ्यांना २०० शालेय नोटबुक आणि शैक्षणिक किट वाटप केली.एकूणच अनेक शैक्षणिक व सामाजिक उपक्रम राबविले.वृक्षरोपण केले.कोरोना काळात अनेकांना मदत केली.विकलाँगांना व्हीलचेअर देऊन आधार दिला.अश्यातच अपघातग्रस्त विद्यार्थिनीला दत्तक घेत तिचा इयत्ता ७ वी पर्यंत येणारा सर्व शैक्षणिक खर्चाची जबाबदारी घेणार असल्याने सुशिला पूरेड्डिवार यांचे कौतूक होत आहे.यावेळी आक्सापूर शाळेचे मुख्याध्यापक रविंद्र मोहुर्ले,संजय गजबे,शालिनी खोब्रागडे,विषय शिक्षक शैलेश झाडे,टेकाम आदिंची उपस्थिती होती.

# आदिवासी संस्कृतीचे जतन करा-खासदार अशोक नेते

## मौजा-देवरी येथील गोंडवाना आदिवासी सांस्कृतिक सभागृहाचे लोकार्पण

**देवरी । प्रतिनिधी**

दिं.२७ ऑक्टोंबर २०२३ देवरी तालुका हा मागासलेला व अतिदुर्गम म्हणून ओळखल्या जाणारा तालुका आहे.या तालुक्यात मोठ्या प्रमाणात आदिवासी समाज बांधव राहतात. आदिवासी तळागाळातील दुर्बल व आर्थिक दृष्टया वंचित घटक व आदिवासींची संस्कृती टिकुण राहावी यासाठी देवरी येथे गोंडवाना आदिवासी सांस्कृतिक सभागृह मंजुर करण्यात आला .याचा फायदा देवरी तालुक्यातील आदिवासी समाज बांधवांना होईल या निमित्ताने येथे दिल्या गेलेला सभागृह अतिशय महत्त्वाचा आहे.या सभागृहांत विविध धार्मिक कार्य,आदिवासी चे विविध कार्यक्रम व सांस्कृतिक कार्यक्रम, या सभागृहांत होईल. यांचा निश्चित फायदा आदिवासी समाज बांधवांना होईल. या सभागृहांत आदिवासी संस्कृतीक संमेलन, मेळावे होतील या निमित्ताने आदिवासी सांस्कृतीचे जतन सुद्धा होईल असे प्रतिपादन खासदार अशोक नेते यांनी अध्यक्षीय स्थानावरून बोलतांना केले.

पुढे बोलतांना खासदार अशोक नेते यांनी देवरी येथे सांस्कृतिक सभागृह निश्चितच आशेचा किरण ठरणार आहे.सांस्कृतिक,धार्मिक सुविधांपासून वंचित राहिलेल्यांना प्रवाहात आणण्याचा सुकर मार्ग या द्वारे प्राप्त झाला असून आदिवासी समाजानी आपली संस्कृती जपावी. आदिवासी बांधवांनी शिक्षणाकडे वळून शिक्षणाच्या प्रवाहात येऊन वैयक्तिक व सामाजिक विकास साधावा.शिक्षण हा महत्वाचा घटक असुन् मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करावे. आदिवासी समाजासाठी केंद्र व राज्य शासनाच्या अनेक योजना आहेत त्यांचा सुद्धा आपण चांगला लाभ घ्यावा. असे यावेळी वक्तव्य केल. या कार्यक्रमाचे उद्घाटक ना.डॉ.विजयकुमार गावित आदिवासी विकास मंत्री,यांनी उद्घाटन स्थानावर बोलतांना आदिवासी समाजासाठी केंद्रीय



अर्थसंकल्पात भरघोस निधीची तरतूद केली, आदिवासींच्या विकास कामांना गती व चालना देण्याचे काम हे केंद्र व राज्य सरकार करीत असून हे सरकार आदिवासी, शेतकरी, कष्टकरी, कामगार, वंचित- शोषित अशा सगळ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, प्रकल्प कार्यालय देवरी जि.गोंदिया च्या वतीने जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना अंतर्गत गोंडवाना आदिवासी सांस्कृतिक सभागृहाचे लोकार्पण सोहळा आयोजित करण्यात आला होता.यावेळी मंचावर प्रामुख्याने ना.डॉ.विजयकुमार गावित (मंत्री,आदिवासी विकास विभाग म.रा.) खासदार तथा राष्ट्रीय महामंत्री भाजपा अनु. जनजाती मोर्चाचे अशोक नेते, माजी आमदार संजय पुराम,भंडारा, गोंदिया लोकसभेचे समन्वय विरेंद्र अंजनकर,आदिवासी महामंडळाचे अध्यक्ष भारतसिंग दुधनाग, शिक्षण महर्षी तथा जेष्ठ नेते झामसिंग येरणे,जिल्हा महामंत्री अनिल येरणे, तालुकाध्यक्ष प्रविण दहिकर, प्रकल्प अधिकारी विकास राचेलवार,न.प. नगराध्यक्ष संजय उईके, न.प.उपाध्यक्षा प्रज्ञा संगीडवार, सभापती पं.स. अंबिका बंजार,अनिल बिसेन उपसभापती, कल्पना वालोदे जि.प.सदस्या,महेश जैन ,आदिवासी नागरिक, बंधू आणि भगिनीं,विद्यार्थी,विदयार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कोजागिरी पौर्णिमा व ग्रहण



खंडग्रास चंद्रग्रहण

आश्विन शु. १५,दि. २८ ऑक्टोबर शनिवार रोजी कोजागिरी पौर्णिमेच्या दिवशी मध्यरात्री खंडग्रास चंद्रग्रहण आहे .

ग्रहण स्पर्श –रात्री १:०५

ग्रहण मध्य – रात्री १.४४

ग्रहण मोक्ष –रात्री २.२३

ग्रहण पर्वकाल – १ तास २८ मि.चा आहे.

( संदर्भ दाते पंचांग )

हे ग्रहण भारतासह सर्वत्र खंडग्रास दिसणार आहे.

ग्रहण दिसणारे प्रदेश – भारतासह संपूर्ण आशिया, ऑस्ट्रेलिया, रशिया, संपूर्ण युरोप, संपूर्ण अफ्रिका खंड या प्रदेशात ग्रहण दिसेल.

पुण्यकाल – ग्रहण स्पर्शापासून ग्रहण मोक्षापर्यंत पुण्यकाल आहे.

ग्रहणाचा वेध –हे ग्रहण रात्रीच्या तिसऱ्या प्रहरात असल्याने ३ प्रहर आधी म्हणजे शनिवारी २८ ऑक्टोबर रोजी दुपारी ३:१४ पासून ग्रहणाचे वेध पाळावेत. बाल, वृद्ध, अशक्त, आजारी व्यक्ती आणि गर्भवतींनी शनिवारी सायंकाळी ७:४१ पासून वेध पाळावेत. वेधामध्ये भोजन करू नये. स्नान, जप, देवपूजा, श्राद्ध इ. करता येतील, तसेच पाणी पिणे, झोपणे, मलमूत्रोत्सर्ग करता येईल. ग्रहण पर्वकाळात म्हणजे १:०५ ते २:२३ या काळात पाणी पिणे, झोपणे, मलमूत्रोत्सर्ग ही कर्मे करू नयेत.

**ग्रहणातील कृत्ये**

ग्रहणस्पर्श होताच स्नान करावे.पर्वकालामध्ये देवपूजा, तर्पण, श्राद्ध , जप, होम, दान करावे.पूर्वी घेतलेल्या मंत्राचे पुरश्चरण चेद्ग्रहणात करावे, ग्रहण ग्रहण मोक्षानंतर स्नान करावे. ग्रहणकालामध्ये पर्वकालामध्ये झोप, मलमूत्रोत्सर्ग, अभ्यंग, भोजन, ही कर्मे करू नयेत. अशौच असता ग्रहणकालात ग्रहणासंबंधी स्नान, दान करण्यापुरती शुद्धी असते.

**ग्रहणाचे राशिपरत्वे फल**

मिथुन, कर्क, वृश्चिक, कुंभ या राशीना शुभफल. सिंह, तुला, धनु, मीन या राशीना मिश्रफल. मेष,वृषभ, कन्या आणि मकर या राशीना अनिष्ट फल आहे. ज्या राशींना अनिष्ट आहे त्या राशीच्या व्यक्तीनी आणि गर्भवतींनी हे ग्रहण पाहू नये.

**कोजागिरी व ग्रहण**

यावर्षी २८ ऑक्टोबर २०२३ रोजी शनिवारी कोजागिरी पौर्णिमेच्या दिवशीच चंद्रग्रहण आल्यामुळे रात्री १:०५ मि. ते २:२३ असा ग्रहणाचा पर्वकाल आहे . त्यापूर्वीच्या वेधकाळात म्हणजे संध्याकाळ ७.४१ पासून रात्री १:०५ मी.पर्यंत प्रतीवर्षीप्रमाणे रात्रीचे वेळी लक्ष्मी व इंद्राचे पूजन करून दूध साखरेचा नैवेद्य दाखवता येईल . मात्र प्रसाद म्हणून केवळ एक पळीभर किंवा चमचाभर दूध प्राशन करावे . राहिलेले दूध दुसरे दिवशी रवीवारी भोजनाचा कार्यक्रम घेता येईल . मात्र दूध झाकून ठेवून त्यावर तुळशीपत्र ठेवावे .ज्यां गर्भवतींना या काळात नियम पाळायचे असतील त्यांच्यासाठी नियम :–

१) या काळात कापणे , चिरणे , पिळणे व शिवणे पूर्ण बंद ठेवावे .

२) पायाची अढी घालून बसू नये .

३) पाणी पितांना त्यात तुळशीपत्र घालून प्यावे .

४) झोप घेऊ नये .

५) शक्यतो नामस्मरण करावे .

**संकलन**

**चरडेशास्त्री**

**बी.एस.सी.मायक्रो**

**एम ए ज्योतिष कवि कुलगुरु कालीदास विद्यापीठ रामटेक**

**विश्वशांतिधाम संत सयाजी महाराज सेवाश्रम**

**संत सयाजी नगर, शेवा लकर लेआउट नांदगांव रोड हिंगणघाट**

**जिला वर्धा**

**दर सोमवार वरोरा**

**व.राष्ट्रसंत कृषि केंद्र वरचा मजला कटारीया भवन जवळ वनी रोड वरोरा.९९७५०४१५३८**

# चीनचा विस्कटलेला 'बेल्ट व रोड शो'




बेल्ट व रोड उपक्रमाबाबतची आक्रमकता कायम राखत त्यात सर्वसमावेशकता आणण्याचा चीन सरकारचा प्रयत्न आहे. पण जागतिक नेत्यांनी तिसऱ्या 'बेल्ट व रोड फोरम'च्या परिषदे'कडे पाठ फिरवल्याने चीनच्या योजनांवर सध्या तरी थंड पाणी पडले आहे.चीनच्या 'बेल्ट व रोड उपक्रमा'त सहभागी देशांची चीनने आयोजित केलेली तिसरी शिखर परिषद तीन घडामोडींनी गाजते आहे. एक,रशियाचे अध्यक्ष पुतीन यांचा परिषदेतील सक्रिय सहभाग; दोन, जगातील खूप कमी राष्ट्रप्रमुख वा सरकार प्रमुखांची या परिषदेस उपस्थिती; आणि तीन, चीनकडून बेल्ट व रोड उपक्रमाचा नवा अवतार साकारण्याची कसरत!बीजिंग येथे १७–१८ ऑक्टोबर रोजी बेल्ट व रोड फोरम (बीआरएफ) परिषद झाली. यावर्षी मार्च महिन्यात चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांनी रशियाला भेट दिल्यानंतर, याच वर्षातील दुसरी जिनपिंग–पुतीन भेट व चर्चा यानिमित्ताने घडली, याचा उल्लेख करावा लागेल. मागील १० वर्षातील जिनपिंग–पुतीन यांच्यातील ही तब्बल ४२ वी भेट व चर्चा आहे.पुतीन यांच्या भेटीचे महत्त्व असे की रशियाच्या युक्रेन युद्धानंतर ते प्रथमच एवढ्या मोठ्या शिखर परिषदेत सहभागी झाले आहेत; नव्हे तर ते प्रथमच देशाबाहेर पडले आहेत. रशियाच्या युक्रेन युद्धाने चीन–रशिया सामरिक व आर्थिक भागीदारी सखोल व सदृढ झाल्याचे पुतीन यांच्या सहभागाने पुन्हा अधोरेखित झाले. या निमित्ताने पुतीन यांनी इतरही काही देशांच्या प्रमुखांशी/प्रतिनिधींशी चर्चा केली, तर व्हिएतनामच्या पंतप्रधानांनी पुतीन यांना त्यांच्या देशात आमंत्रित केले.सन २०१३ मध्ये चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांनी बेल्ट व रोड उपक्रमाची (त्यावेळी 'वन बेल्ट वन रोड') घोषणा केल्यानंतर सन २०१७ व २०१९ मध्ये अनुक्रमे पहिल्या व दुसऱ्या 'बीआरएफ' परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. आता चार वर्षांनी आयोजित तिसऱ्या 'बीआरएफ'चे अतिभव्य आयोजन अपेक्षित होते. चीनने नुकतेच १९ व्या आशियाई क्रीडास्पर्धेचे यशस्वी आयोजन केले होते.या स्पर्धेत चीनने एकीकडे स्वत:च्या श्रीमंतीचे व व्यवस्थापकीय कौशल्याचे प्रदर्शन घडवले, तर दुसरीकडे २०१ सुवर्णपदकांची कमाई करत आशियातील वर्चस्व निर्विवादपणे सिद्ध केले (स्पर्धेत दुसऱ्या क्रमांकावरील जपानला ५२ तर तिसऱ्या व चौथ्या स्थानावरील दक्षिण कोरिया व भारताला अनुक्रमे ४२ व २८ सुवर्णपदके जिंकता आली.).या पार्श्वभूमीवर, तिसऱ्या 'बीआरएफ'च्या आयोजनातून जागतिक स्तरावर भू–आर्थिक वर्चस्व व राजकीय स्वीकारार्हता दाखवून देण्याचा चीनचा हेतू निश्चितच असणार. या परिषदेत १४० देशांचे नेते सहभागी होणार असल्याचे आभासी चित्र चीनने निर्माण केले होते. प्रत्यक्षात केवळ २३ देशांचे प्रमुख या परिषदेत सहभागी झाले. इतर देशांनी त्यांचे उपाध्यक्ष, परराष्ट्रमंत्री, परराष्ट्रसचिव किंवा त्याहूनही कनिष्ठ पदावरील प्रतिनिधी पाठवले होते.या तुलनेत पहिल्या व दुसऱ्या 'बीआरएफ'मध्ये अनुक्रमे ३० व ३७ देशांचे सर्वोच्च नेते सहभागी झाले होते. यंदा युरोपमधून फक्त हंगेरीचे पंतप्रधान परिषदेत उपस्थित होते, तर 'बेल्ट व रोड' उपक्रमातून माघार घेण्याच्या निर्णयावर इटली ठाम आहे. तीस आंतरराष्ट्रीय संघटनांचे उच्चस्तरीय प्रतिनिधी आणि खुद्द संयुक्त राष्ट्राचे सरचिटणीस अँटोनिओ गुटेरेस परिषदेत सहभागी होते हीच तेवढी चीनच्या दृष्टीने जमेची बाजू होती.तिसऱ्या 'बीआरएफ'ने 'बेल्ट व रोड उपक्रमा'बाबत जगाची तीन गटांत झालेली विभागणी अधिक स्पष्ट केली आहे. चीनच्या या उपक्रमात रशिया, मध्य आशियातील पाच गणराज्ये, मंगोलिया, इराण, पाकिस्तान, अफगाणिस्तान (तालिबानचे प्रतिनिधी या परिषदेत उपस्थित होते), उत्तर कोरिया, म्यानमार, थायलंड, इंडोनेशिया, नेपाळ व श्रीलंका हे देश गुंफले गेले आहेत. मागील दहा वर्षांमध्ये या सर्व देशांशी असलेला चीनचा व्यापार व या देशांतील चीनच्या गुंतवणुकीत लक्षणीयरीत्या वाढ झाली आहे.'बेल्ट व रोड उपक्रमा'च्या विरोधात असलेला गट म्हणजे क्वाड देश, दक्षिण कोरिया व युरोपीय महासंघ! चीनकरिता हे अनपेक्षित नाही. तिसऱ्या गटातील देश, म्हणजे पश्चिम आशिया, लॅटिन अमेरिका व आफ्रिकेतील बहुतांश देश हे 'बेल्ट व रोड उपक्रमा'त सहभागी असले तरी आता ते सावधपणे पावले टाकत आहेत. चीनचा अपेक्षाभंग करणारी ही घडामोड आहे.एकूण १५२ देश व ३० आंतरराष्ट्रीय संघटनांनी चीनशी द्विपक्षीय स्तरावर 'बेल्ट व रोड उपक्रमा'त सहकार्याचे सामंजस्य करार केले आहेत. पण निम्म्याहून अधिक देश या उपक्रमाबाबत फारसे उत्साही नाहीत. यातून केवळ चीनचे हित साधले जात असल्याची अनेक देशांची धारणा झाली आहे. 'बेल्ट व रोड' म्हणजे प्रचंड चिनी गुंतवणूक आणि त्याद्वारे हजारो चिनी अभियंते, व्यवस्थापक व कामगार यांची नेमणूक ही प्रतिमा तयार झाली आहे.याशिवाय या उपक्रमातील भव्य संचारप्रकल्प म्हणजे पर्यावरणाची अपरिमित हानी, आर्थिक शाश्वततेविषयी प्रश्नचिन्ह आणि सहकारी देशांची फुगत जाणारी कर्जे असेही समीकरण तयार झाले आहे. ही प्रतिमा बदलण्यासाठी चीनची धडपड सुरु आहे. चाणाक्ष शी जिनपिंग यांनी ही बाब हेरत या वेळी 'बीआरएफ'चे घोषवाक्य 'संयुक्त नियोजन, संयुक्त उभारणी, संयुक्त हितसंवर्धन' हे ठेवले होते.'जगाचा उत्तम विकास झाला तरच चीनचा विकास घडेल आणि चीन विकसित झाल्यास जगाचा उत्तमोत्तर विकास होईल', अशी मांडणी जिनपिंग यांनी तिसऱ्या 'बीआरएफ'मध्ये केली आहे. उच्च प्रतीचे 'बेल्ट व रोड सहकार्य' वृद्धिंगत करण्यासाठी चीनद्वारे आठ महत्त्वाची पावले उचलण्याची घोषणा जिनपिंग यांनी या परिषदेत केली.यामध्ये मुख्यत: बहुआयामी संचारजाळ्याची निर्मिती, मुक्तअर्थव्यवस्थेचे संवर्धन, पर्यावरणाला पोषक शाश्वतविकास, लोकांची आंतरराष्ट्रीय स्तरावरील ये–जा व संपर्क वाढवणे आणि मजबूत आंतरराष्ट्रीय संस्थात्मक बांधणी या तत्त्वांचा समावेश आहे.जिनपिंग यांनी बहुआयामी संचार जाळ्यांकरिता नव्याने शंभर अब्ज अमेरिकी डॉलरपर्यंतची गुंतवणूक करण्याची तयारी दर्शवली आहे. यापैकी सुमारे ६० अब्ज डॉलरची गुंतवणूक 'चायना डेव्हलपमेंट बँक' व 'चिनी एक्झिम बँक' यांच्या माध्यमातून (ज्यांत देऊ करण्यात येणारी कर्जे असू शकतात), तर ऊर्वरित ४० अब्ज डॉलर चिनी खासगी उद्योगांच्या माध्यमातून अपेक्षित असतील.'बेल्ट व रोड..' मध्ये सहभागी देशांच्या चीनमधील गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्याकरिता गुंतवणुकीवर असलेले निर्बंध काढण्याची घोषणाही जिनपिंग यांनी केली. या दोन घोषणांतून जिनपिंग यांनी एका दगडात दोन पक्षी मारण्याचा प्रयत्न केला आहे. एक तर, सहकारी देशांतील गुंतवणुकीत खासगी क्षेत्राचा मोठा वाटा असल्यास त्यावर तेवढे चिनी सरकारचे नियंत्रण नसेल व विकसनशील देशांना चीनची धास्ती बाळगण्याचे कारण उरणार नाही.दुसरी बाब म्हणजे 'बेल्ट व रोड उपक्रमा'त सहभागी झाल्यास चीनच्या उत्पादनक्षेत्रात गुंतवणूक करणे सोपे होईल. विकसित व वेगाने विकसित होऊ घातलेल्या देशांना लोभात पाडणारे हे चित्र आहे. याशिवाय, कोळसाविरहीत ऊर्जानिर्मिती, मोठमोठ्या प्रकल्पांसह सहकारी देशांच्या गरजेनुसार छोटे–छोटे प्रकल्प आणि जागतिक स्तरावरील ए.आय. शासनप्रणालीच्या दिशेने वाटचाल यांचा अंतर्भाव पुढील काळात 'बेल्ट व रोड उपक्रमा'त करण्याचे सूतोवाच चीनने केले आहे.बेल्ट व रोड उपक्रमाबाबतची आक्रमकता कायम राखत त्यात सर्वसमावेशकता आणण्याचा चीनचा प्रयत्न आहे; पण जागतिक नेत्यांनी तिसऱ्या 'बीआरएफ'कडे पाठ फिरवल्याने चीनच्या योजनांवर सध्या तरी थंड पाणी पडले आहे.

# लाटांपासून ऊर्जा

समुद्रकिनारे लाभलेले कॅनडा, चीन, रशिया, इंग्लंड यांसारखे काही देश या स्रोताचा वापर करून घेतात. आपल्याकडे कच्छच्या आखातात लाटांपासून मोठ्या प्रमाणावर सागरी ऊर्जा मिळवता येईल.खनिज इंधनाचा वापर कमी करून शाश्वत उर्जेच्या निर्मितीवर आता भर दिला जात आहे. त्यासाठी सूर्यप्रकाश किंवा वारा अशा नैसर्गिक स्रोतांचा माणसाने हुशारीने वापर करून घेतला आहे. तसाच सागरी लाटा हा आणखी एक स्रोत आहे. लाटांमध्ये आणि भरती–ओहोटीत होणाऱ्या पाण्याच्या हालचालींमध्ये गतिज (कायनेटिक) ऊर्जा असते. विशिष्ट टर्बाइन वापरून या गतिज उर्जेचे विद्युत उर्जेत रूपांतर करता येते. भरतीच्या वेळी किनाऱ्यावर लाटा जोराने आपटत असतील, तर तिथे अधिक ऊर्जानिर्मिती करता येते.समुद्रकिनारे लाभलेले कॅनडा, चीन, रशिया, इंग्लंड यांसारखे काही देश या स्रोताचा वापर करून घेतात. आपल्याकडे कच्छच्या आखातात लाटांपासून मोठ्या प्रमाणावर सागरी ऊर्जा मिळवता येईल.



डेक्स्टर कूपर या इंजिनीअरने हा मार्ग १९२०पासून आपल्याला खुला करून दिला असला, तरी गेल्या शंभर वर्षांत सागरी उर्जेचे मोजकेच प्रकल्प उभे राहिलेले दिसतात. यामागे दोन मुख्य कारणे आहेत– आर्थिक आणि पर्यावरणीय. प्रकल्प उभारणीचा खर्च पाहता, त्यातून मिळणारी ऊर्जा तुलनेने कमी आहे. आर्थिक गुंतवणूक आवाक्याबाहेर जात असल्याने आपल्याकडील गुजरात आणि पश्चिम बंगाल येथील दोन प्रकल्प रद्द करावे लागले. शून्य कार्बन उत्सर्जन आणि शाश्वत ऊर्जा हे या स्रोताचे फायदे आहेत. भरती आणि ओहोटीच्या वेळा माहीत असल्याने ऊर्जानिर्मितीचा अंदाजही नीट बांधता येतो. पण एखादे नवीन तंत्रज्ञान वापरून खर्च कमी करावा लागेल. दुसरा मुद्दा आहे पर्यावरणाचा. अशा प्रकल्पाच्या जागा किनाऱ्याजवळ असल्याने तेथील सागरी जिवांना आवाजाचा त्रास, टर्बाइनच्या पात्यात अडकण्याची भीती, स्थलांतरात अडथळा अशा अडचणी येतात. प्रकल्पाच्या बांधकामामुळे आसपासचे पाण्याचे प्रवाह मंदावले, तर पाण्यातील क्षारांचे प्रमाण बदलून परिसंस्थांवर (इकोसिस्टिम्सवर) परिणाम होतो. किनाऱ्यापासून थोड्या अंतरावर प्रकल्प उभारून हे धोके कमी करता येतील. पण ऊर्जानिर्मितीही घटेल. त्यासाठी काय करता येईल, यावर संशोधन सुरू आहे.

# माजी केंद्रीय मंत्री बबनराव ढाकणेंचे निधन

**अहमदनगर**–एक संघर्षशील नेते म्हणून परिचित असणारे माजी केंद्रीय मंत्री बबनराव दादाबा ढाकणे याचे गुरुवारी रात्री दुःखद निधन झाले. ते ८७ वर्षांचे होते. गत ३ आठवड्यांपासून ते न्यूमोनियाने त्रस्त होते. त्यांच्यावर अहमदनगर येथील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. गुरुवारी रात्री त्यांना हृदयविकाराचा झटका आला आणि



त्यातच त्यांचे निधन झाले, अशी माहिती त्यांच्यावर उपचार करणाऱ्या डॉक्टरांनी दिली आहे.बबनराव ढाकणे यांचा जन्म १० नोव्हेंबर १९३७ रोजी अकोल्यात झाला. ते बीड लोकसभा मतदारसंघातून जनता दलाच्या तिकिटावर लोकसभेवर निवडून गेले होते. त्यांनी गोवा मुक्तिसंग्रामातही सहभाग घेतला होता. गत काही दिवसांपासून बबनराव ढाकणे यांना न्यूमोनियाने घेरले होते. त्यांच्यावर नगर येथील साईदीप रुग्णालयात उपचार सुरू होते. गुरुवारी रात्री त्यांची प्रकृती ढासळली. त्यातच त्यांना हृदयविकाराचा झटका आल्यामुळे त्याचे निधन झाले. रुग्णालयाचे प्रमुख डॉ. एस एस दीपक यांनी पत्रकारांना ही माहिती दिली.बनराव ढाकणे यांचे पार्थिव शुक्रवारी पाथर्डी येथील हिंदसेवा वसतिगृहामध्ये अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. शनिवारी दुपारी २ वाजता पाथर्डी तालुक्यातील पागोरी पिंपळगाव येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार केले जातील.बबनराव ढाकणे यांनी विद्यार्थी दशेतच थेट दिल्लीला जाऊन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची १९५१ मध्ये भेट घेतली होती. हे त्यांच्या आयुष्यातील पहिले आंदोलन ठरले होते. त्यांनी गोवामुक्ती लढ्यातही भाग घेतला होता. पाथर्डी तालुक्याच्या विकासाच्या मुद्यावर त्यांनी विधानसभेत पत्रके भिरकावली होती.ढाकणे यांनी बाजार समितीपासून आपल्या राजकारणाची सुरुवात केली. पंचायत समिती, जिल्हा परिषद, विधानसभा व लोकसभा असा त्यांचा यशाचा टप्पा राहिला. महाराष्ट्रात सार्वजनिक बांधकाम खात्याचे मंत्री, ग्राम विकास खात्याचे कॅबिनेट मंत्री, जनता पक्षाचे अध्यक्ष अशा विविध जबाबदाऱ्या त्यांनी पार पाडल्या. तत्कालीन पंतप्रधान चंद्रशेखर यांच्या सरकारमध्ये ते ऊर्जा राज्यमंत्री होते.राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी त्यांच्या मृत्यूवर शोक व्यक्त केला आहे. ज्येष्ठ नेते, माजी केंद्रीय मंत्री बबनराव ढाकणे यांच्या निधनाचे वृत्त दुःखद आहे. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली! विद्यार्थी चळवळीतून पुढे येत त्यांनी राज्याच्या व देशाच्या राजकारणात आपले वेगळे स्थान निर्माण केले, तसेच गोवा मुक्तिसंग्रामात देखील योगदान दिले. या कठीण प्रसंगी त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात मी सहभागी आहे. त्यांना या दुःखातून सावरण्याचे बळ मिळो आणि मृतात्म्यास सद्गती लाभो, हीच प्रार्थना! असे ते म्हणालेत.

# घसरलेली जीवनवाहिनी

उपनगरी रेल्वेच्या १५० स्थानकांवरून रेल्वेगाड्यांमध्ये लोक अक्षरशः स्वतःला लिंपून घेत प्रवास करतात. खासकरून मध्य रेल्वेचा वक्तशीरपणा पार विस्कटून गेला असून रेल्वे प्रशासनाकडे प्रवाशांच्या गाऱ्हाण्यावर समाधानकारक उत्तर नाही.मुंबईच्या उपनगरी रेल्वेसेवेला जीवनवाहिनी म्हटले जाते. मध्य, पश्चिम, हार्बर आणि आता ट्रान्सहार्बर असा उपनगरी रेल्वेचा वाढलेला पसारा आहे. या मार्गांवरील लोकलगाड्यांमधून रोज ७२ लाख प्रवाशांची नोकरी–धंदा व शिक्षणासाठी ये–जा सुरू असते. मात्र, रेल्वेच्या इंडिकेटरवरील वेळेशी त्यांचे घड्याळ कधी जुळत नाही. उपनगरी रेल्वेच्या १५० स्थानकांवरून रेल्वेगाड्यांमध्ये लोक अक्षरशः स्वतःला लिंपून घेत प्रवास करतात. खासकरून मध्य रेल्वेचा वक्तशीरपणा पार विस्कटून गेला असून रेल्वे प्रशासनाकडे प्रवाशांच्या गाऱ्हाण्यावर समाधानकारक उत्तर नाही.काही प्रवाशांनी ट्वीटद्वारे रेल्वेला प्रश्न विचारले असता रेल्वेने त्याच त्या पठडीतील कारणांची जंत्री सादर करून पुढे 'इत्यादी,' असे लिहून पाठवले. यावरून रेल्वेच्या विभागीय व्यवस्थापकांना या प्रश्नाचे गांभीर्य किती आहे, ते लक्षात येते. मध्य रेल्वेवर बदलापूर, दिवा, कल्याण, दादर, परळ तर पश्चिम रेल्वेवर वसई, नालासोपारा, दहिसर, अंधेरी यासारखी बेसुमार गर्दीची ठिकाणे आहेत. या स्थानकांच्या वैशिष्ट्यपूर्ण समस्या असतात. रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या स्थानकांवर जाऊन प्रवाशांशी संवाद साधून समस्या जाणून घ्यायला हव्यात. रेल्वेने मोठा गाजावाजा करीत वातानुकूलित उपनगरी गाडी आणली. आजही त्यांची संख्या मर्यादितच आहे. त्याचे कारण म्हणजे व्यावहारिक समस्या काय उद्भवतील, त्याचा विचारच केला गेला नाही. वातानुकूलित रेल्वे ही आता काळाची गरज असली, तरी वहनक्षमता आणि भाड्यांतील फरक हे मुद्दे आड येत आहेत. रेल्वेचे मासिक पासाचे भाडे तुलनेने किफायतशीर असूनही आज हजारो प्रवासी विनातिकिट फिरतात.तिकिट तपासनिसांची व्यवस्था आणखी कडेकोट केल्यास इतक्या



मोठ्या संख्येने रेल्वेला चुना लावण्याचे धारिष्ट्य कुणी दाखवणार नाही. केंद्र सरकारच्या अखत्यारीतील प्रश्नांवर महाराष्ट्रातील खासदारांनी रेल्वेचे प्रश्न अग्रक्रमाने नवी दिल्लीत रेल्वे खात्यापर्यंत न्यावेत. रेल्वेच्या हद्दीतील बांधकामांना नोटिसा दिल्या जातात, तेव्हाच मतपेटीवर डोळा ठेवून खासदार आणि नेते रेल्वेच्या प्रश्नांकडे वळतात. एरव्ही रेल्वे प्रवाशांच्या समस्यांकडे कुणीही बघत नाही. मेट्रो रेल्वेचे जाळे विस्तारत असताना पूर्वापारच्या उपनगरी जाळ्यातील समस्यांकडे मात्र दुर्लक्ष होत आहे. रविवारी किंवा सुट्टीच्या दिवशी बाहेरगावच्या प्रवाशांना जेव्हा उपनगरी रेल्वेचा आधार घ्यावा लागतो, तेव्हा तर त्यांची पार दैना उडते. लोकप्रतिनिधी प्रवाशांच्या या समस्यांकडे गांभीर्याने केव्हा पाहतील?

सह्याद्रीचा राखणदार



# नव मतदार नोंदणीसाठी विशेष मोहीम – जिल्हाधिकारी विनय गौडा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

निवडणुकीच्या प्रक्रियेत मतदार हा महत्वाचा घटक आहे. त्यामुळे जिल्ह्यातील जास्तीत जास्त नव मतदारांची नोंदणी करण्यासाठी जिल्हा प्रशासनातर्फे विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. मतदार यादीत नाव नसलेल्या पात्र नागरिकांनी या मोहिमेदरम्यान आपल्या नावाची नोंदणी करून घ्यावी व आगामी निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले.

भारत निवडणूक आयोगाच्या सुचनेनुसार १ जानेवारी २०२४ या अर्हता दिनांकावर आधारित छायाचित्र मतदार यादीच्या विशेष पुनरिक्षण कार्यक्रमाची माहिती पत्रकार परिषदेत देतांना ते बोलत होते. यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी अश्विनी मंजे उपस्थित होत्या.जिल्हाधिकारी गौडा म्हणाले, भारत निवडणूक आयोगाने पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत १८ ते १९ वयोगटातील महाविद्यालयातील नव मतदार, दुर्गम भागातील भटक्या व विमुक्त जातीतील नागरीक, तृतीयपंथी नागरिक, देहविक्री करणा–या महिला, लैंगिक अत्याचाराने पिडीत महिला, अनाथालयातील १८ वर्षांवरील मुले / मुली, वृद्धाश्रमातील वृद्ध नागरिक आदींचे मतदार यादीत नाव नोंदणी करण्याकरीता विशेष मोहीम राबविण्याबाबत सुचना



दिल्या आहेत. त्यानुसार जिल्ह्यात १९ ऑक्टोबर २०२३ पासून महाविद्यालयात १८ ते १९ वयोगटातील तसेच ज्या विद्यार्थ्यांचे मतदार यादीत नाव नाही, अशा विद्यार्थ्यांची नोंदणी करण्यासाठी जिल्ह्यातील १०५ महाविद्यालयात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.नव मतदारांच्या नोंदणीकरीता जिल्ह्यात ४ आणि ५ नोव्हेंबर २०२३ तसेच २५ आणि २६ नोव्हेंबर २०२३ रोजी जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रावर विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. सदर मोहिमेंतर्गत संबंधित मतदान क्षेत्रातील मतदारांनी मतदान केंद्रस्तरीय अधिका–यांकडे उपलब्ध मतदार यादीची तपासणी करून आपले नाव असल्याची खात्री करावी. मतदार यादीत नाव नसल्यास नमुना – ६, संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्याकडे आवश्यक कागदपत्रांसह सादर करावे.तसेच २७ ऑक्टोबर ते ९ डिसेंबर २०२३ या कालावधीत महाविद्यालयातील १८ ते १९ वयोगटातील विद्यार्थ्यांची १०० टक्के नोंदणी करण्याकरीता विशेष शिबीर आयोजित करण्यात येणार आहे. दि. १८ आणि १९ नोव्हेंबर २०२३ रोजी संपूर्ण जिल्ह्यात विद्यार्थ्यांसाठी, महिलांसाठी आणि दिव्यांग व्यक्तिंसाठी तर २ आणि ३ डिसेंबर रोजी तृतीयपंथी नागरिक, देहविक्री व्यवसाय करणा–या महिला आणि भटक्या व विमुक्त जमातीच्या व्यक्तिंसाठी विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे.शुक्रवार, दि. २७ ऑक्टोबर २०२३ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. २७ ऑक्टोबर ते ९ डिसेंबर २०२३ या कालावधीत दावे व हरकती स्वीकारण्यात येईल. मंगळवार, दि.२६ डिसेंबर २०२३ पर्यंत दावे व हरकती निकाली काढण्यात येणार आहेत. सोमवार, दि.१ जानेवारी २०२४ रोजी मतदार यादी विहित मापदंडानुसार योग्य असल्याचे तपासून अंतिम प्रसिद्धीकरिता निवडणूक आयोगाची परवानगी घेणे तसेच शुक्रवार दि. ५ जानेवारी २०२४ रोजी जिल्ह्याची सर्व मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल.निवडणूक आयोगाने दिलेल्या पुनरिक्षण पूर्व उपक्रमानुसार जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्राच्या सुसूत्रीकरणाची कार्यवाही करण्यात आली आहे. सहा विधानसभा मतदारसंघातील सुसूत्रीकरणापूर्वी मतदान केंद्राची संख्या २०२३ होती. मतदान केंद्राच्या इमारतीमध्ये बदल करण्यात आलेल्या मतदान केंद्राची संख्या ५४ आहे. १३७ मतदान केंद्राच्या नावामध्ये बदल करण्यात आला आहे तर विलीन करण्यात आलेल्या मतदान केंद्राची संख्या २ आहे. प्रस्तावित नवीन मतदान केंद्राची संख्या ११ असून एकूण २११ मतदान केंद्राचे सुसूत्रीकरण करण्यात आले आहे. सुसूत्रीकरणानंतर होणारी मतदान केंद्राची संख्या ही २०३२ झाली आहे.

**जिल्ह्यातील मतदारांची संख्या :**
**१ जानेवारी २०२३ या अर्हता दिनांकावर जिल्ह्यामध्ये विधानसभा मतदारसंघानुसार एकूण ९ लक्ष २५ हजार १५० पुरुष मतदार, ८ लक्ष ७७ हजार ६०९ स्त्री मतदार, तर ५२ तृतीयपंथी असे एकूण १८ लक्ष २ हजार ८११ मतदार आहेत. जिल्ह्यात एकूण ९९७९ दिव्यांग व्यक्तिंची नोंदणी असून यापैकी मतदार म्हणून ५२२७ दिव्यांगांची नोंदणी झाली आहे.**

# जिल्हाधिकाऱ्यांनी केली बांबु संशोधन व प्रशिक्षण केंद्राची पाहणी



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चिचपल्ली येथील बांबु संशोधन व प्रशिक्षण केंद्राला (बीआरटीसी) जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी भेट देऊन कामकाजाची पाहणी केली. यावेळी तहसीलदार विजय पवार, बी.आर.टी.सी. चे वनपरिक्षेत्र अधिकारी ए.डी.मल्लेलवार, नायब तसीलदार खंडाळे, वनपाल कोसनकर, तलाठी श्री. आत्राम तसेच इतर कर्मचारी उपस्थित होतेयावेळी जिल्हाधिकारी गौडा यांनी प्रकल्प परिसरात सार्वजनिक बांधकाम विभागामागर्फत चालू असलेल्या कामाची पाहणी केली. तसेच येथे असलेल्या विविध बांबू इमारती, बांबु संशोधन व प्रशिक्षण केंद्रामार्फत सुरू असलेले अल्पमुदत आणि दीर्घमुदत बांबू प्रशिक्षण कार्यक्रम, बांबू सेटम येथे लावलेल्या विविध बांबू प्रजाती, बांबू प्रक्रिया प्रकल्प इत्यादी बाबत माहिती जाणून घेतली. येथे सुरू असलेली कामे तातडीने पूर्ण करून सदर प्रकल्प बी.आर.टी.सी. यांना हस्तांतरीत करण्याचे निर्देश यावेळी जिल्हाधिका–यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले.तसेच आगीच्या दृष्टिने धोकादायक असणारे स्थळ जसे विद्युत विभाग परिसर, हनुमान मंदिर परिसर याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना माहिती देण्यात आली. प्रकरणी जागा पाहणी करून अहवाल सादर करावा, असे निर्देश त्यांनी तहसीलदार विजय पवार यांना दिले.

# महाकाली पालखी नगर प्रदक्षिणा यात्रेत विविध सामाजिक सेवाभावी संस्थांनी दिली सेवा

## शोभायात्रेत सहभागी भक्तांसाठी शितपेय आणि पाण्याची व्यवस्था





**चंद्रपूर । प्रतिनिधी**

श्री माता महाकाली महोत्सवनिमित्त निघालेल्या महाकाली माता पालखी नगर प्रदक्षिणा शोभायात्रेत विविध सामाजिक सेवा भावी संस्थाच्या वतीने सेवा देत शोभायात्रेत सहभागी मातेच्या भक्तांसाठी शित पेय आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

२३ ऑक्टोंबरला निघालेल्या माता महाकाली नगर प्रदक्षिणा द्वारे पाच दिवस चाललेल्या श्री. माता महाकाली महोत्सवाचा समारोप करण्यात आला. या दरम्यान शोभायात्रेत सहभागी मातेच्या भक्तांसाठी महाकाली मंदिर जवळ रघुविर अहिर मित्र परिवारच्या वतीने पाणी आणि शित पेय वाटप करण्यात आले. अंचलेश्वर मंदिर जवळ महानगरपालीका प्रशासनाच्या वतीने पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. गिरणार चौक येथे रामु तिवारी मित्र परिवारच्या वतीने पिण्याचे पाणी आणि शितपेयाची व्यवस्था करण्यात आली होती. जैन मंदिर येथे राहुल पुगलिया मित्र परिवारच्या वतीने ही मातेच्या भक्तांसाठी शितपेयाची व्यवस्था करण्यात करण्यात आली होती. लोकमान्य टिळक विद्यालय जवळ मुस्लिम हक्क संघर्ष समितीच्या वतीने पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच बोहरा समाज आणि किदवाई स्कूलच्या वतीनेही पालखी यात्रेत सहभागी भक्तांसाठी पिण्याच्या पाण्याची व शितपेयाची व्यवस्था करण्यात आली होती. यासह ईतर अनेक सामाजिक संघटनांनी, व्यापारी मंडळांनी अल्पोपहाराची व्यवस्था केली होती. यासर्व सेवाभावी संस्थेचे श्री महाकाली माता सेवा समितीच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले आहे.

# श्रीराम प्रभूच्या दर्शनासाठी मातृशक्तीची अयोध्येकडे कूच पालकमंत्री आणि खासदारांनी झेंडी दाखवून केले रवाना

**भंडारा । प्रतिनिधी**

अयोध्येतील श्री राम जन्मभूमीत प्रभू श्रीरामाचे आणि काशी विश्वेश्वराचे दर्शन घेण्यासाठी भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यातील मातृशक्ती आज रवाना झाली. जय श्रीराम चा जयघोष करीत अयोध्येसाठी निघणाऱ्या वाहनांना जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. विजयकुमार गावित आणि खासदार सुनील मेंढे यांनी भगवा झेंडा दाखवून रवाना केले.



विश्वमांगल्य सभा धर्म संस्कृती शिक्षा विभाग द्वारा आयोजित धर्मजीवन दर्शन यात्रेला आज २७ रोजी भंडारा येथून प्रारंभ झाला. विश्वमांगल्य सभेच्या शुभांगी मेंढे यांच्या नेतृत्वात भंडारा गोंदिया जिल्ह्यातील १२७ महिला प्रयागराज, काशी विश्वनाथ आणि श्री राम जन्मभूमी अयोध्या येथे जाऊन दर्शन घेणार आहेत. श्री बहिरंगेश्वर मंदिर परिसरातून या मातृशक्तीच्या वाहनांना अयोध्येच्या दिशेने रवाना करण्यात आले. त्यापूर्वी श्री बहिरंगेश्वर मंदिरात समस्त महिला, जिल्ह्याचे पालकमंत्री डॉक्टर विजयकुमार गावित, सुनील मेंढे आणि अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत महाआरती करण्यात आली.या यात्रेत सहभागी प्रत्येक महिलेचा जय श्रीराम चा दुपट्टा घालून पालकमंत्री आणि खासदारांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.जय श्रीराम चा जयघोष, फटाक्यांची आतिषबाजी आणि ढोल ताशाच्या गजरात पालकमंत्री आणि खासदारांनी भगवी झेंडी दाखवीत गाड्या रवाना केल्या. एका सकारात्मक हेतूने काढली जात असलेली धर्मजीवन दर्शन यात्रा अत्यंत महत्त्वाची असून मातृशक्तीच्या माध्यमातून धर्म आणि संस्कृती रक्षणासाठी हे महत्त्वाचे पाऊल ठरेल असे यावेळी खासदार सुनील मेंढे यांनी सांगितले.कोट्यवधी भारतीयांचे स्वप्न राम मंदिराच्या रूपाने साकार होत आहे. त्यामुळे हा प्रत्येक भारतीयांसाठी गर्वाचा क्षण असल्याचे ते म्हणाले. ३० ऑक्टोबर पर्यंत यात्रा राहणार असून नंतर परतीच्या प्रवासाला सुरुवात होईल.यात्रेत सहभागी महिलांमध्ये आज प्रचंड उत्साहाचे वातावरण होते. श्रीराम प्रभूंचे दर्शन हा भाग्याचा विषय असल्याने त्याची ओढ प्रत्येकाच्या मनी असल्याचे यातून दिसत होते.यावेळी उल्हास फडके, चैतन्य उमाळकर, संजय एकापुरे, डॉ नरेंद्र व्यवहारे, विकास मदनकर, मंगेश वंजारी, अनुप ढोके, तुषार काळबांधे, माला बगमारे, गीता सिडाम, रोहिणी आस्वले, अविनाश ब्राह्मणकर, महेंद्र निम्बार्ते,आकाश फाले, भूषण महाकाळकर,बंटी तांडेकर,सुखदेव वंजारी,व अनेक मान्यवर उपस्थित होते.

# खोजेवाडी येथे गांजाची झाडे लावणाऱ्याला अटक

**सातारा । प्रतिनिधी**

सातारा तालुक्यातील खोजेवाडी येथे गांजाची आल्याच्या शेतामध्ये १८ झाडे लावणाऱ्या शेतकऱ्याला स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली आहे .गांजाच्या १८ झाडांचे १०९ किलो वजन भरले असून हा २७ लाख ३४ हजार पाचशे रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे लहू कुंडलीक घोरपडे (वय ६२ रा. खोजेवाडी) असे संबंधित इसमाचे नाव आहे. बोरगाव पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.याबाबतची अधिक माहिती अशी अमली पदार्थ व्यापाऱ्यांच्या संदर्भात पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी कडक कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अरुण देवकर यांना गोपनीय बातमीदारा मार्फत खोजेवाडी येथे गांजाची शेती होत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी गावात जाऊन माहिती घेतली असता ६२ वर्षीय घोरपडे नावाच्या शेतकऱ्याने त्याच्या आल्याच्या शेतामध्ये गांजाच्या १८ झाडांची लागवड केली होती असे आढळून आले .पोलिसांनी घोरपडे याला विचारले असता हे शेत कोणाचे तर त्याने हे शेत आपले



असल्याचे सांगितले पोलिसांनी १०९ किलो वजनाची गांजाची १८ झाडे जप्त केली बाजारपेठेमध्ये या गांजाची २७ लाख ३४ हजार पाचशे रुपये किंमत आहे घोरपडे याच्यावर उत्तेजक द्रव्यमनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ च्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात आली आहे याप्रकरणी बोरगाव पोलिस ठाण्यामध्ये गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.या कारवाईमध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक सुधीर पाटील, रवींद्र भोरे, उपनिरीक्षक पतंग पाटील, विश्वास शिंगाडे, अमित पाटील, आतिश घाडगे, संजय शिर्के, विजय कांबळे ,लक्ष्मण जगधने, शिवाजी इंगवले, हसन तडवी, शिवाजी भिसे, राजू कांबळे, गणेश कापरे, अमित माने यांनी कारवाईत भाग घेतला होता.

# देवरी तालुक्यातील चिल्हाटी येथे समाज मंदिर बांधकामाचे भूमिपुजन



**देवरी । प्रतिनिधी**

दि.२७ ऑक्टोंबर २०२३ ला,देवरी तालुक्यातील मौजा चिल्हाटी येथे खासदार अशोक नेते यांच्या स्थानिक विकास निधीतून मंजुर समाज मंदिराच्या कामाचे भूमिपूजन खासदार अशोक नेते यांच्या हस्ते आज दि.२७ ऑक्टोंबर २०२३ ला चिल्हाटी येथे कुदळ मारून करण्यात आले.

यावेळी ग्रामपंचायत कार्यालय चिल्हाटी च्या वतीने खासदार अशोक नेते यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी खासदार अशोक नेते यांनी गावकऱ्यांशी संवाद साधत माझ्या स्थानिक विकास निधीतून समाज मंदिराला दक्ष लक्ष रुपये मंजुर केले. गावकऱ्यांनी यांचा चांगला लाभ घ्यावा. असे व्यक्तव्य यावेळी केले.यावेळी खासदार तथा राष्ट्रीय महामंत्री भाजपा अनु.जनजाती मोर्चा चे अशोक नेते,शिक्षण महर्षी झामसिंग येरणे,जेष्ठ नेते दिपक शर्मा,देवरी भाजपा तालुकाध्यक्ष प्रविण दहिकर,चिल्हाटी चे सरपंच पुष्तकला मडावी,उपसरपंच राम हिरवाणे,छोटू भाटीया,राजू शाहू,श्रीवुषी भाटीया,धनराज बावणथडे,ग्रामसेवक घुबळे,तसेच गावातील नागरिक उपस्थित होते.

# शिवनेरी येथे भागवत सप्ताहात डॉ.अंकुश आगलावेचा सत्कार



**वरोरा । प्रतिनिधी**

पुणे येथील जुन्नर गावात छत्रपती शिवाजी महाराज यांची जन्मभुमी शिवनेरी किल्ल्यावर भवानी मातेच्या मंदीरात भागवत सप्ताहाचे आयोजन छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव तथा शिवाजी संस्था , गड किल्ले समितीच्या वतीने करण्यात आले होते. . या कार्यक्रमास डॉ. अंकुश आगलावे यांना आमंत्रित करण्यात आले होते. भागवत सप्ताहात डॉ. आगलावे यांचा समाजात उत्कृष्ठ कार्य केल्याबद्दल सप्तनिक सत्कार करण्यात आला. भागवत कार्यक्रमाची सुरूवात भजन किर्तनाव्दारे करण्यात आली. यावेळी गुरूदेव सेवा मंडळाचे पदाधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते. दरवर्षी भागवत सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. यावेळी भागवत सप्ताहात डॉ. आगलावे यांनी सहभाग घेवून किर्तनकार यांचेसोबत भजन गायले. यावेळी वारकरी संप्रदाय व गुरूदेव प्रचारक मोठया संख्येने उपस्थित होते.

# वरोरा शहर व ग्रामीण दुर्गोत्सवात ग्रामगीताचे वितरण



**वरोरा । प्रतिनिधी**

वरोरा शहर व ग्रामीण भागात दुर्गोत्सव मोठया उत्सवात साजरा करण्यात आला. भद्रावती तालुक्यातील कुचना गावातील नवरात्र दुर्गा उत्सवातील विजेत्या स्पर्धकांना ग्रामगीता व देणगी देवून डॉ. अंकुश आगलावे यांनी सत्कार केला. .वरोरा शहर व ग्रामीण भागात विविध दुर्गोत्सव मंडळास भेटी देवून ग्रामगीता वाटप करण्यात आले. तसेच मंडळास देणगी देण्यात आली. बावने ले – आऊट येथील नवदुर्गा उत्सव मंडळाचे महिला पदाधिकारी यांचा सर्वधिकारी लक्ष्मणराव गमे, प्रा. रूपलाल कावळे यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी गुरूदेव सेवा मंडळाच्या वतिने सामुदायिक ध्यान, प्रार्थना घेण्यात आली. नवदुर्गा मंडळाचे महिला पदाधिकारी यांनी ध्यान व प्रार्थनेत सहभाग घेतला. या प्रसंगी श्री. गुरूदेव प्रचारक, केंद्रिय मानवाधिकार संगठनचे पदाधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते.

## चंद्रपूर शहरासाठी २७० कोटी रुपयांची वाढीव पाणीपुरवठा योजना मंजूर

# पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पाठपुराव्यामुळे मिळाली प्रशासकीय मान्यता

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

केंद्रशासन पुरस्कृत अमृत-२ अभियानांतर्गत चंद्रपूर शहरासाठी २७०.१३ कोटी रुपयांच्या वाढीव पाणी पुरवठा प्रकल्पास प्रशासकीय मान्यता मिळाली असून, राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांनातून चंद्रपूर महानगरपालिकेच्या माध्यमातून हा प्रकल्प पूर्णत्वास येणार आहे. यासंदर्भातील शासन निर्णय नगर विकास विभागाने निर्गमित केला आहे. केंद्राच्या अमृत दोन अभियानांतर्गत पाणीपुरवठा सरोवरांचे पुनरुज्जीवन व हरितक्षेत्र विकास इत्यादी पायाभूत सुविधांची निर्मिती राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये करण्यात येत आहे. यापुर्वीच्या अमृत अभियानांतर्गत समाविष्ट असलेल्या राज्यातील ४४ शहरांमध्ये मलनि:सारणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यानुसार सदर अभियानांतर्गत राज्याच्या १८२३६.३९ कोटी प्रकल्प किंमतीच्या राज्य जलकृती आराखड्यास केंद्र शासनाने मान्यता दिलेली आहे. यामध्ये चंद्रपूर महानगरपालिकेचा पाणीपुरवठा प्रकल्प समाविष्ट व्हावा, यासाठी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या या पाठपुराव्याला अखेर यश मिळाले असून चंद्रपूर नगरातील नागरिकांसाठी उत्तम प्रकारे पाणी पुरवठा होण्यासाठी हा प्रकल्प उपयुक्त ठरणार आहे. या प्रकल्पाकरिता केंद्र शासनामार्फत प्रकल्पाच्या ३३ टक्के म्हणजे ९०.०३ कोटी रुपये मिळणार असून, राज्य शासन यासाठी प्रकल्पाच्या ३६.६७ टक्के



रक्कम म्हणजे ९९.०६ कोटी रुपये देणार आहे. तर चंद्रपूर महानगरपालिका ३० टक्के रक्कम अर्थात ८१.०४ कोटी रुपये निधी देणार आहे.

**चंद्रपूर शहराकरीता वाढीव पाणीपुरवठा योजना**

सद्यस्थितीत इरई धरणावरून १२ दलघमी पाण्याची उचल महानगरपालिकेमार्फत करण्यात येते. शहरातील सांडपाण्यावर प्रक्रिया करून पाण्याचा पुनर्वापर करण्याबाबत महानगरपालिका व महाजनकोमध्ये करारनामा झाला आहे. सदर करारनाम्यातील अटीनुसार पुनर्वापराकरीता उपलब्ध होण्याच्या पाण्याच्या बदल्यात शहरातील पाणी पुरवठ्याकरीता इरई धरणावरून पाणी उपलब्ध करून देण्याचे ठरले आहे. शहरात पुढील २५ वर्षाकरीता इरई धरणावरून अतिरिक्त उपलब्ध होणारे पाणी लक्षात घेता अमृत २.० अंतर्गत चंद्रपूर शहराकरीता वाढीव पाणीपुरवठा योजना प्रस्तावित आहे.यामध्ये नवीन इनटेक वेल, इस्पेक्शन वेल, पंपिंग हाऊस, बीपीटी, ॲप्रोच ब्रिज, पंपिंग मशिनरी, डब्ल्युटीपी, ट्रान्समिशन नेटवर्क आदींचा समावेश आहे. सद्यस्थितीत पाण्याची उचल ४५ एम.एल.डी. असून भविष्यातील पाण्याची मागणी (वर्ष २०४८ पर्यंत) ९१.१६ एम.एल.डी. असू शकते. त्यामुळे उर्वरित पाण्याची मागणी ४६.१६ एम.एल.डी. असणार आहे. प्रशासकीय मान्यतेकरीता सदर कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल नगर विकास विभागाचे प्रधान सचिव यांच्याकडे २४ एप्रिल २०२३ रोजी सादर करण्यात आला होता. राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या बैठकीमध्ये प्रस्तावाला मंजुरी प्रदान करण्यात आली असून राज्य उच्चाधिकार सुकाणू समिती कार्यकक्षाकडे सदर प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. तसेच ९ ऑक्टोबर २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये चंद्रपूर शहराच्या वाढीव पाणी पुरवठा योजनेकरीता २७०.१३ कोटीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

# दुर्गोत्सव हा नारी शक्तीचा जागर:आ.प्रतिभा धानोरकर

## भद्रावती येथे सार्वजनिक महिला मंडळांचा सत्कार

**भद्रावती । प्रतिनिधी**

दुर्गोस्तव व शारदोत्सव हा खऱ्या अर्थाने नारी शक्तीचा जागर असून या काळात नारी शक्ती दिसून येते, शहरातील सार्वजनिक महिला मंडळांनी नवरात्र, दुर्गोत्सव तथा शारदा उत्सवाची परंपरा अबाधित ठेवली असल्याचे मत आमदार प्रतिभा धानोरकर यांनी व्यक्त केले. दिनांक २६ व २७ ला शहरातील सार्वजनिक शारदा तथा दुर्गा विसर्जनाचा विसर्जन सोहळा शांततेत पार पडला. यानिमित्त काँग्रेस तर्फे गांधी चौकात शहरातील सार्वजनिक शारदा व दुर्गा महिला मंडळाचे स्वागत करण्यात आले. यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी आमदार प्रतिभा धानोरकर, माजी नगराध्यक्ष अनिल धानोरकर, वंदना धानोरकर, शहर अध्यक्ष सुरज गावंडे, मनोहर नागपुरे, सरिता सूर, प्रमोद नागोसे, प्रशांत




झाडे, संदीप कुमरे, तनु शेख, प्रतिभा सोनटक्के, जयश्री दातारकर, कविता सुपी, रुक्साना शेख, कोमल नागोसे आदी मान्यवर उपस्थित होते. शहरातील सर्व शारदा तथा दुर्गा विसर्जनाच्या मिरवणुका गांधी चौकात पोहोचल्यानंतर प्रत्येक महिला मंडळाचे अध्यक्ष तथा सचिवांचा आमदार प्रतिभा धानोरकर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी शहरातील सर्व महिला मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर स्वागत सोहळ्याला यशस्वी करण्यासाठी निखिल राऊत, रितेश वाढई, छोटू धकाते, महेश कोथळे, सुयोग धानोरकर आदींनी सहकार्य केले.

## सर्पदंशाने बैलाचा जागीच मृत्यू; शेतकरी संकटात

**वरोरा । प्रतिनिधी**

तालुक्यातील उखर्डा येथील शेतकरी सुधाकर कुडे यांचा बैल शेतात बांधुन असताना सर्पदंश झाल्याने जागीच मृत्यू झाला. त्यामुळे शेतकरी संकटात सापडला असून या हंगामात बैल मरण पावल्याने शेतकर्यांच्या समोर खूप मोठी समस्या उभी राहिली आहे.

या बाबत शेतकऱ्याने शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) युवासेना सैनिक अभिजित कुडे यांना कॉल करुन या घटनेची माहिती दिली. अभिजित कुडे यांनी तात्काळ शेतात जावून पाहणी केली. पशु वैद्यकीय अधिकारी यांनी तात्काळ पंचनामा केला. संबंधित विभागाला तशा सूचना करून तात्काळ भरीव मदत करावी अशी मागणी अभिजित कुडे यांनी केली आहे. खरीप हंगामात बैल नसले तर शेतकरी शेती कसा करेल त्याला बैल शिवाय पर्याय



नाही त्यामुळे दुसरा बैल घ्या साठी या हंगामात शेतकर्याची आर्थिक परिस्थिती नसते त्यामुळे मिळणारी मदत ही भरीव व तात्काळ देण्यात यावी अशी मागणी अभिजित कुडे यांनी केली. शेतकर्याला जास्तीत जास्त मदत मिळवून देऊ अशी हमी दिली. शेतकर्यांच्या पाठीशी खंबीरपणे शिवसेना उभी आहे असा विश्वास व्यक्त करून शेतकर्याला धीर दिला. यावेळी डॉक्टर शेंन्द्रे, डॉक्टर माहुरे , स्वप्निल कुडे,विनोद कुडे. शेतकरी उपस्थित होते.

## ग्राम पंचायत चिनोरा ला जिल्हा स्तरावर स्वच्छ्ता अभियान अंतर्गत तृतीय पुरस्कार



**वरोरा । प्रतिनिधी**

तालुक्यातील ग्रामपंचायत चिनोरा ला संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छ्ता अभियान सन २०२१२०२२ अंतर्गत जिल्हा स्तरावर तृतीय पुरस्कार प्राप्त झाला असून नूतन सावंत उपमुख्य कार्यकारी अधिकारी(पाणी व स्वच्छता) यांच्या हस्ते ताई परचाके सरपंच चिनोरा, वंदना ढेगळे उपसरपंच, एकनाथ चापले (ग्रामसेवक) यांना दोन लक्ष रुपयाचे बक्षिस देण्यात आले. या वेळी सामाजिक कार्यकर्ते अविनाश ढेगळे उपस्थित होते.

हा पुरस्कार प्राप्त करण्यास सर्व ग्राम पंचायत सदस्य रेखा आसुटकर, अनिता बोथले, मधुकर कोंडापे, ज्योती गायकवाड,छाया कोल्हेकर, निलेश डोंगरकर,चंदा रौतेल व ग्राम पंचायत कर्मचारी व चिनोरा वासियाचे सहकार्य लाभले .पुन्हा गाव विकास साठी सर्वांना सोबत घेऊन गावाचा विकास करू असे मत ताई परचाके सरपंच व उपसरपंच वंदना ढेगळे यांनी व्यक्त केले व सर्वाचे आभार मानले.

# विदर्भ अशासकीय महाविद्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनेची सभा संपन्न

**वरोरा । प्रतिनिधी**

लोकशिक्षण संस्था वरोरा द्वारा संचालित लोकमान्य महाविद्यालय वरोरा येथे विदर्भ अशासकीय महाविद्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनेची सभा संघटनेचे अध्यक्ष शामराव पंचवटे यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सभेला प्रमुख पाहुणे म्हणून लोकशिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा. श्रीकांत पाटील, उपाध्यक्ष श्रीकृष्ण घड्याळपाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुबोध कुमार सिंग उपस्थित होते. प्रास्ताविकातून संघटनेचे महासचिव संदीप हिवरकर यांनी संघटनेची भुमिका व कार्य याबद्दल माहिती दिली. अध्यक्ष शामराव पंचवटे यांनी १२ व २४ वर्षा ची आश्वासीत प्रगती योजना लागू करण्यात संघटनेची मोठे योगदान होते तसेच संघटना कर्मचारी हीताकरीता नेहमी प्रयत्न करत असते असे मत व्यक्त केले. संस्थेचे अध्यक्ष प्रा.श्रीकांत पाटील यांनी आपल्या मनोगतातुन महाविद्यालयातील कर्मचारी यांना आम्ही कुटुंबातील सदस्या प्रमाने मानतो तसेच महाविद्यालयातील कर्मचारी सुद्धा महाविद्यालयातील कामाकरिता नेहमी तत्पर असतात असे मत व्यक्त केले व संघटनेच्या पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.



सुबोध कुमार सिंग यांनी महाविद्यालयातील कर्मचारी हा महाविद्यालयाचा आत्मा आहे असे मत व्यक्त केले व संघटनेच्या पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या सभेमध्ये आश्वासित प्रगती योजना १०/२०/३० या तीन लाभाची योजना ,सातव्या वेतन आयोगातील थकबाकी अशा विविध विषयावर चर्चा करण्यात आली. विदर्भ संघटनेतील तसेच महासंघावरील रिक्त पदावर विदर्भ संघटनेत उपाध्यक्ष म्हणून कृष्णा बावनथडे लोकमान्य महाविद्यालय वरोरा सचिव म्हणून कमलाकर डुकरे आनंद निकेतन महाविद्यालय वरोरा व सचिव म्हणून प्रकाश मेश्राम महात्मा फुले महाविद्यालय बल्लारशा यांची नेमणूक करण्यात आली. महासंघ प्रतिनिधी म्हणून सचिन सुरवाडे जनता महाविद्यालय चंद्रपूर यांची निवड करण्यात आली तसेच राऊत यांची विदर्भ संघटनेच्या कोषाध्यक्षपदी नेमणूक करण्यात आली सभेत महासंघ ,विदर्भ संघटना व जिल्हा संघटनेचे पदाधिकारी विजयकुमार घरात, सुनील चिमूरकर, तिलक बांगडे, मनोज धोंगडे, विजयकुमार जांभुळकर ,दिलीप उपासे, संजय तामगाडगे, डॉ.हेडाऊ, डॉ.शरद मानकर, गोपाल ढोणे, श्याम बारापात्रे, नंदलाल शर्मा, साखरे अनवर खान,तसेच इतर पदाधिकारी उपस्थित होते कार्यक्रमाच्या यशस्वी करिता महाविद्यालयाचे कर्मचारी चंद्रशेखर वाटकर ,नरेश गोंडाने, प्राची कानव ,कृष्णा बावनथडे गजानन लांडे, दीपक मडावी ,रवींद्र पाटील अमित मुरडीव, अमोल निंबाळकर, तन्मय घुडे यांनी सहकार्य केले.

## मेरी माटी मेरा देश अभियानासाठी आपल्या कार्यकर्त्यांची निवड ही अभिमानास्पद बाब:टोंगे

**वरोरा । प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या वतीने देशभरात भारत मातेच्या विरांच्या सन्मानार्थ राबविण्यात येत असलेल्या 'मेरी माटी मेरा देश' या उपक्रमात वरोरा तालुक्यासाठी नेहरू युवा केंद्राच्या वतीने शुभम शिवशंकर आमने व निकिता माणुसमारे यांची अमृत कलश घेऊन जाण्यासाठी निवड झाली असून ते आपले कार्यकर्तेअसल्याचा अभिमान असल्याचे किशोर टोंगे यांनी प्रतिपादन केले. आज ते दोघेही मुंबई येथील कार्यक्रमाकरिता रवाना झाले असून मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या मार्गदर्शनात मुंबई येथील कार्यक्रम पार पाडून दिल्ली करिता रवाना होत आहेत.

आज पंचायत समिती वरोराच्या वतीने या स्वयंसेवकांना मातीचा कलश सोपविण्यात आला. हा आमच्यासाठी सर्व कार्यकर्त्यांसाठी अभिमानाचा क्षण आहे. समाजकारणात काम करत असताना आमच्या कार्यक्रत्यांना अशी संधी मिळणे हा त्यांच्या सामाजिक कामाचा गौरव आहे असे मी मानतो असेही ते




म्हणाले.आपल्या गावागावातील मातीचा कलश गट विकास अधिकारी संदीप गोडशेलवार आणि त्यांचे सहकारी नरेंद्र पेटकर, प्रणव बसे व अन्य अधिकारी कर्मचारी यांच्या उपस्थितीत शुभम कडे सोपविला ही अभिमानाची बाब असून शुभम आणि निकिता दिल्ली येथील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत होणाऱ्या कार्यक्रमात उपस्थित राहणार आहे ही आपल्यासाठी आनंदाची बाब आहे.यावेळी त्यांच्या वतीने शुभम आमने आणि निकिता माणुसमारे या दोघांचाही सन्मान करण्यात आला व पुढील वाटचालीस त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी शुभम आमने आणि निकिता यांनी आपल्याला ही संधी मिळाली त्याबद्दल प्रशासन आणि किशोर टोंगे यांचे आभार मानले.

## वाघाच्या मृत्यूबाबत वनमंत्री मुनगंटीवार यांनी घेतली तातडीची बैठक

## विजेच्या धक्क्याने होणारे वाघांचे मृत्यू रोखण्यासाठी तात्काळ उपाययोजना करण्याचे दिले वनाधिकाऱ्यांना निर्देश

**नागपूर । प्रतिनिधी**

विजेच्या धक्क्याने होणारे वाघांचे मृत्यू शून्य करण्यासाठी तात्काळ अभ्यासपूर्ण उपाययोजना करणेबाबत वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी आज प्रधान सचिव, वने व राज्यातील वरिष्ठ वनाधिकाऱ्यांना नागपूर येथे झालेल्या तातडीच्या बैठकीत निर्देश दिले.राज्यात गेल्या काही दिवसांपासून अवैध शिकारीचे प्रमाण शुन्यावर आले असले तरी विजेच्या धक्क्याने होणारे वाघांचे मृत्यू ही चिंताजनक बाब आहे. यासंदर्भात जनजागृती, कायदेशीर तरतूदी, प्रशिक्षण इत्यादी बाबींवर लक्ष केंद्रीत करावे व असे प्रकार होऊ नये यासाठी सर्वांनी नियोजनपुर्वक प्रयत्न करावे असेही निर्देश यावेळी सुधीर मुनगंटीवार यांनी दिले.

काल गडचिरोली येथे विजेच्या धक्क्याने एका वाघाचा मृत्यू झाला होता. त्याची गंभीर दखल घेत वनमंत्र्यांनी आज नागपूर येथील एफ.डी.सी.एम. भवन येथे तातडीची बैठक



आयोजित केली होती. यावेळी गडचिरोली येथील वाघाच्या मृत्यू संदर्भात वनमंत्र्यांनी तपास करुन तात्काळ कार्यवाहीचे निर्देश दिले होते. त्यानुसार वन विभागाने जलद गतीने तपासाची सूत्रे हलवून सर्व आरोपींस अटक करण्यात आली असल्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांनी सांगितले. यावेळी वनमंत्री यांनी वन विकास महामंडळाच्या विविध कामांचा आढावा घेऊन ही कामे जलदगतीने पुर्ण करण्याच्या सूचना दिल्या.या बैठकीस प्रधान सचिव (वने) वेणुगोपाल रेड्डी, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महिप गुप्ता, महाराष्ट्र वन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विकास गुप्ता, वनसंरक्षक गडचिरोली रमेश कुमार इ. अधिकारी या बैठकीस उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .